महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
ज्ञानसेवा तु साफल्यम्

email @- equitydept@maa.ac.in | 708, सदाशिवपेठ, कुमठेकरमार्ग, पुणे- 411030 | call@ 020-24476938


जा.क्र./रा.शै.सं. प्र.प म./NEP/शिक्षा सप्ताह/२०२४-२५/03855 दिनांक:१६/०७/२०२४

प्रति,

शिक्षणाधिकारी, प्राथमिक व माध्यमिक, सर्व

प्रशासन अधिकारी, नपा/ नप/मनपा, सर्व

शिक्षण निरीक्षक, ( दक्षिण, पश्चिम व उत्तर)

विषय : “शिक्षण सप्ताह " साजरा करणेबाबत..
दिनांक २२ ते २८ जुलै, २०२४

संदर्भ: १. मा.सचिव, भारत सरकार, शालेय शिक्षण व साक्षरता विभाग, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.D.O. No. ०२-०५ / २०२४- IS.१४, दिनांक ०९ जुलै, २०२४.

२. मा.उपसचिव शालेय शिक्षण विभाग यांचे पत्र क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.२२८/ एस.डी. ४, दिनांक १२ जुलै, २०२४

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने राष्ट्रीय शिक्षण धोरण२०२ -० च्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त दिनांक २२ ते २८ जुलै, २०२४ या कालावधीत **"शिक्षण सप्ताह"** साजरा करणेबाबत केंद्रीय शिक्षण मंत्रालयामार्फत संदर्भ क्र. १ नुसार कळविण्यात आले आहे. शिक्षण सप्ताहात आठवडयाचा प्रत्येक दिवस एका विशिष्ट उपक्रमासाठी नियोजित करण्यात आला असून, यामध्ये शिक्षण व विकासाच्या विविध पैलूंचा समावेश आहे हा शिक्षण सप्ताह .विद्यार्थी, शिक्षक, धोरणकर्ते व भागधारक यांच्यामध्ये सहकार्य वाढविणारा ठरणार आहे.

शिक्षण सप्ताहामध्ये खालीलप्रमाणे उपक्रम रावण्याबाबत संदर्भाधीन पत्रान्वये सूचित करण्यात आलेले आहे.

| अनु. क्र | दिनांक | उपक्रम |
|---|---|---|
| १ | सोमवार, दि. २२ जुलै, २०२४ | अध्ययन अध्यापन साहित्य दिवस (TLM Day) ( परिशिष्ट १) |
| २ | मंगळवार, दि.२३ जुलै, २०२४ | मुलभूत संख्याज्ञान व साक्षरता दिवस ( FLN Day) ( परिशिष्ट २) |
| ३ | बुधवार, दि. २४ जुलै, २०२४ | क्रीडा दिवस ( Sports Day) ( परिशिष्ट ३) |
| ४ | गुरुवार, दि. २५ जुलै, २०२४ | सांस्कृतिक दिवस ( Cultural Day) ( परिशिष्ट ४) |
| ५ | शुक्रवार, दि. २६ जुलै, २०२४ | कौशल्य व डिजिटल उपक्रम दिवस ( Skilling and Digital Initiatives Day) (परिशिष्ट - ५ अ & ५ ब) |
| ६ | शनिवार, दि.२७ जुलै, २०२४ | मिशन लाईफच्या दृष्टीक्षेपात इको क्लब उपक्रम/ शालेय पोषण दिवस (Eco Clubs for Mission LiFE/ School Nutrition Day) (परिशिष्ट ६) |
| ७ | रविवार, दि. २८ जुलै, २०२४ | समुदाय सहभाग दिवस( Community involvement Day) (परिशिष्ट ७) |

संदर्भ क्र. १ तसेच सोबतच्या परिशिष्ट १ ते ७ मधील मार्गदर्शक सूचनांनुसार शिक्षण सप्ताहामधील उपरोक्त तक्त्यातील उपक्रमांची अंमलबजावणी नेमून दिलेल्या कालावधीत आपण पूर्ण करावी.

शिक्षण सप्ताहादरम्यान आयोजित उपक्रमांची छायाचित्रे व माहिती Tracker वर upload करणेबाबत दिलेल्या विहीत नमुन्यामध्ये माहिती जतन करून ठेवावी व मा. आयुक्त (शिक्षण) यांच्या निर्देशानुसार कार्यवाही करावी.

16/07/25

( राहूल रेखावार)
संचालक
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण
महाराष्ट्र, पुणे.

सोबत :

१. संदर्भ क्र. १ चे पत्र
२. मार्गदर्शक सूचना परिशिष्ट १ ते ७

**प्रत कार्यवाहीस्तव:**

१. संचालक, प्राथमिक शिक्षण संचलनालय, पुणे.
२. संचालक, माध्यमिक शिक्षण संचलनालय, पुणे.
३. विभागीय शिक्षण उपसंचालक, (सर्व)

**प्रत:**

१. उपसंचालक, प्रादेशिक विद्या प्राधिकरण, (सर्व)
२. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, (सर्व)

उपरोक्त कार्यालयातील अधिकारी यांनी शिक्षण सप्ताहादरम्यान शाळाभेटी कराव्यात.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर:**

१. मा. प्रधान सचिव शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र, पुणे.
३. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.

**परिशिष्ट क्र. १**

**अध्यापन-अध्ययन साहित्य (TLM) दिन**

दिवस पहिला

सोमवार दि. 22 जुलै, 2024.

प्रस्तुत दिन साजरा करण्यासाठी आणि त्यानुषंगाने वर्गनिहाय उपक्रम राबविण्यासाठी मार्गदर्शक सूचना/तत्त्वे:

**3.1 माध्यमिक स्तर (इयत्ता 11 वी आणि 12 वी):**

1. घोषवाक्ये असलेले पोस्टर्स: "पाणी कसे वाचवायचे" आणि "इतरांना कशी मदत करावी" यासारख्या विषयावर आधारित पोस्टर्स बनविणे.
2. कोडी: विज्ञान आणि गणित या विषयांवर अधिक लक्ष केंद्रित असणारी कोडी तयार करायला सांगणे.
3. खेळ (मैदानी/शारीरिक आणि डिजिटल स्वरूपाचे): सामाजिक शास्त्रे, विज्ञान, गणित आणि भाषा इत्यादी विषयांशी संबंधित खेळांचे आयोजन करणे.
4. त्रिमितीय प्रतिकृती (मॉडेल्स): ऐतिहासिक वास्तू, शारीरिक रचना किंवा भौमितिक आकारांचे त्रिमितीय मॉडेल तयार करण्यासाठी माती किंवा पेपर-मॅचे (कागदी लगदा) यासारख्या नैसर्गिक साहित्याचा वापर करणे.
5. बोर्ड गेम्स (पटावरील खेळ): अध्ययन निष्पत्ती साध्य करण्याच्या दृष्टीने फॅब्रिक किंवा कार्डबोर्डवर (कापड किंवा पुठ्ठ्यावर) खेळ विकसित करून शिकण्याच्या उद्देशांसह पटावरील खेळ तयार करणे.
6. भिंतीवरील तक्ते: महत्वाच्या संकल्पना किंवा ऐतिहासिक कालखंड/सनावळ्या सारांशित करणारे तक्ते तयार करण्यासाठी जुनी वर्तमानपत्रे किंवा कापड वापरणे.
7. वाचन कट्टा (क्लब):वाचन संस्कृती विकसित होण्यासाठी वाचन क्लब स्थापन करणे.

**3.2 पूर्व माध्यमिक आणि माध्यमिक स्तर (इयत्ता 6 वी आणि 10 वी):**

1. कोडी आणि आव्हानात्मक कार्ड तयार करणे.
2. खेळ: ल्युडो सारखे इतर खेळ तयार करणे.
3. खेळणी: कागद आणि बांबूच्या कांड्या यासारख्या किंवा तत्सम प्रकारच्या स्थानिक साहित्यापासून खेळणी बनविणे.
4. कठपुतळी/बाहुलीनाट्य: कपडे आणि टाकाऊ वस्तूंनी कठपुतळी किंवा बाहुली बनविणे.
5. गोष्टीचे कार्डस (Story Cards): पाच ते सहा स्व-स्पष्टीकरणात्मक गोष्टींचे कार्डस तयार करणे.
6. तक्ते बनविणे: "अन्न आणि भाजीपाला", "स्थानिक बाजारपेठ", "माझे कुटुंब" इत्यादी विषयावर आधारित तक्ते बनविणे.
7. वाचन कट्टा (क्लब): वाचन संस्कृती विकसित होण्यासाठी वाचन क्लब स्थापन करणे.

**3.3 पूर्वतयारी स्तर (इयत्ता 3 री ते 5 वी):**

1. तक्ते बनविणे: "अन्न आणि भाजीपाला", "स्थानिक बाजारपेठ", "माझे कुटुंब" इत्यादी विषयाचे तक्ते बनविणे.
2. रंगीत पेटी - घन आणि आयताकृती पेटीच्या बाजूला रंगीत कागद चिकटवून मुले अशा पेट्या तयार करू शकतात.
3. कार्ड: फळे, भाज्या, प्राणी इत्यादींचे कार्ड बनवणे.
4. मुखवटे: प्राणी, पक्षी इत्यादींचे मुखवटे बनवणे.

Scanned with OKEN Scanner

5. वाचन कट्टा आणि कथाकथन सत्र यांचे आयोजन करणे.

**3.4 पायाभूत स्तर (अंगणवाडी / बालवाडी (वय वर्ष 3 ते 6) आणि इयत्ता 1 ली व 2 री):**

1. आपणास उपलब्ध करून देण्यात आलेल्या साहित्य पेट्या -उदा. PSE Kit, महाराष्ट्राचा जादुई पिटारा, भाषा व गणित पेटी, इंग्रजी साहित्य पेटी (ELCRLM) तसेच इतर साहित्याच्या माध्यमातून कृती घ्याव्यात.

2. पालक व शिक्षक यांच्या मदतीने विद्यार्थ्यांच्या छोट्या नाटिकांचे वैयक्तिक अथवा गटामध्ये सादरीकरण घ्यावे.

3. विविध माध्यमांच्या सहाय्याने ठसेकाम करून घ्यावे. उदा. पाणी, फुले, भाज्या, बोटांचे व हातांचे ठसे याप्रमाणे वैविध्यपूर्ण साहित्याचे ठसे घेता येतील.

4. पालक/शिक्षक/विद्यार्थी यांच्या माध्यमातून लोकगीते, लोकनृत्य, लोकसंगीत यांचे सादरीकरण घ्यावे.

5. गोष्टींचा कट्टा- बालकांना स्थानिक व वैविध्यपूर्ण गोष्टी सांगण्यासाठी पालकांना शाळेत निमंत्रित करण्यात यावे.

**प्रत्यक्ष अध्ययन अध्यापन साहित्य दिवस (TLM DAY ) साजरा करणे विषयी मार्गदर्शक सूचना**

शाळेत वैविध्यपूर्ण शैक्षणिक साहित्यांचे स्टॉल म्हणून प्रदर्शन भरवावे. या प्रदर्शनामध्ये पुढील प्रमाणे स्टॉल्स मांडावेत.

1. वैशिष्ट्यपूर्ण स्टॉल्स - वेगळ्या प्रकारचे शैक्षणिक साहित्य दर्शविणारे स्वतंत्र स्टॉल्स मांडण्यात यावेत. प्रत्येक स्टॉलला आकर्षक नावे द्यावीत. उदा. विविध भित्तीपत्रके असलेल्या स्टॉलला "चला शिकूया भित्तिपत्रकातून" तर गोष्टीच्या स्टॉलला "चला गोष्टी ऐकूया", कठपुतळी किंवा पपेटच्या स्टॉलला "जर खेळणी बोलू लागली तर" अशी वैविध्यपूर्ण नावे द्यावीत.

2. शायरी बनवलेले शैक्षणिक साहित्य - आशय शिकण्यासाठी व शिकविण्यासाठी उपयुक्त असणारे शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी बनवलेले विविध शैक्षणिक साहित्य यांचे प्रदर्शन भरवावे.

3. संगीतमय शैक्षणिक साहित्य- या स्टॉलवर शिक्षक व विद्यार्थी यांनी गाणी व संगीत वाद्ये यांचा अध्ययन -अध्यापनात प्रभावी वापर होण्याच्या दृष्टीने दिग्दर्शन करावे.

4. हस्तलिखितांचे प्रदर्शन - विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या गोष्टी व कविता प्रदर्शित कराव्यात.

5. शिक्षकांच्या शैक्षणिक साहित्याचे प्रदर्शन- विविध विषयाच्या अनुषंगाने प्रतिकृती, चार्ट्स, फ्लॅश कार्ड, तरंगचित्र, बाहुल्या अशा प्रकारचे शैक्षणिक साहित्य तयार करून प्रदर्शनात मांडावे.

6. दिग्दर्शन वर्ग - जवळची अध्यापक विद्यालये अथवा अध्यापक महाविद्यालये येथील छात्राध्यापकांच्या मदतीने नाविन्यपूर्ण अशा शैक्षणिक साहित्याच्या साहाय्याने असे वर्ग घ्यावेत अथवा त्यांना तसे स्टॉल लावण्याची संधी द्यावी.

Scanned with OKEN Scanner

परिशिष्ट क्र.२

शिक्षा सप्ताह

दिवस दुसरा

मंगळवार दि.२३ जुलै २०२४

पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान दिवस

**राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० व पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियान :**

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये प्राथमिक स्तरावर सन २०२७ पर्यंत पायाभूत साक्षरता व गणितोय कौशल्य प्राप्त करण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्यात आलेले आहे.सदर धोरणातील महत्वपूर्ण कार्यनिती पुढीलप्रमाणे:

१)पूर्व बाल्यावस्थेतील संगोपन व शिक्षण (ECCE)याला प्राधान्यक्रम

२) पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान या राष्ट्रीय अभियानाची निपुण भारत अभियान म्हणून अंमलबजावणी( शासननिर्णय २७ ऑक्टोबर २०२१ )

३) उच्च दर्जाच्या वैविध्यपूर्ण अध्ययन व अध्यापन साहित्याचे विकसन

४) पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियान गतिमान करण्यासाठी नियमित मूल्यांकन

५) बालकांच्या घरातील अध्ययनाकरिता पालकांचा व समुदायाचा सक्रीय सहभाग

- **पायाभूत साक्षरता व संख्याज्ञानाचे महत्व**

पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्याने इयत्ता २ री च्या अखेरीस आकलनासह वाचन व मुलभूत गणितीय क्रिया करण्याची क्षमता प्राप्त करणे होय.संबंधित कौशल्ये ही पुढील बाबीच्या दृष्टीने महत्वपूर्ण ठरतात.

- बोधात्मक विकास व सर्व अध्ययन क्षमतांचे विकसन
- अध्ययनासाठी सकारात्मक दृष्टीकोन व आत्मविश्वास निर्मिती .
- समतामूलक शिक्षणाची खात्री व अध्ययन अंतर कमी करणे .
- शिक्षणाच्या विविध स्तरावर विद्यार्थ्यांना प्रगती करण्यासाठी सक्षम करणे .

सप्ताहाचा दुसरा दिवस हा पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान दिवस म्हणून साजरा करण्यात यावा.

- उदिष्टे :
  - पायाभूत साक्षरता व संख्याज्ञानाच्या दृष्टीने जाणीव जागृती निर्माण करणे.
  - पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान अनुषंगिक यशस्वी उपक्रम व कृती कार्यक्रम यांचे प्रदर्शन करणे.
  - पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान अनुषंगिक उत्कृष्ट व नाविन्यपूर्ण उपक्रमांची देवाण-घेवाण करणे.
  - पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान यामध्ये शिक्षण तज्ञ ,पालक व समुदाय यांचा सक्रीय सहभाग घेणे .

## पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान दिवसाकरीता आयोजित करावयाचे उपक्रम :

**कार्यशाळा व परिसंवाद आयोजन :** पायाभूत साक्षरता व संख्याज्ञानाच्या अनुषंगाने नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती आणि आनंददायी अध्ययनासाठी केल्या जाणाऱ्या विविध उपक्रमाच्या संदर्भाने शाळेमध्ये शिक्षकांनी कार्यशाळा /परिसंवाद यासारख्या आंतरक्रियात्मक सत्राचे आयोजन करावे .

**बालकांसाठी आंतरक्रियात्मक अध्ययन सत्राचे आयोजन :**

1. शालेय परिपाठादरम्यान निपुण प्रतिज्ञा घेण्यात यावी.
   https://www.youtube.com/watch%20?v=u4R9iLox3ik&t=9s&ab%20channel=%20NCERT OFFICIAL
२. पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान संबंधित कौशल्याच्या विकसनाकरिता राज्याद्वारे विकसित व वितरीत करण्यात आलेल्या भाषिक खेळ पुस्तिका (मराठी,इंग्रजी,उर्दू) व जादुई गणित यामध्ये दिलेले भाषिक व गणितीय खेळ घेतले जावू शकतात.शाळेच्या सकाळच्या सत्रातील ३० मिनिटे भाषेचे तसेच ३० मिनिटे गणिताचे खेळ घेतले जावू शकतात .
३. वाचनाची आवड निर्माण करण्याकरिता कथाकथनाचे व गणित तज्ञाच्या गोष्टीचे सत्र आयोजित करता येतील व संख्याज्ञानाची आवड निर्माण करण्याकरिता शालेय स्तरावर गणित अभ्यास मंडळ तयार करता येईल.
४. जादुई पिटारा/PSE कीट :शासनाकडून उपलब्ध करून देण्यात आलेले PSE कीट / महाराष्ट्र शासनाचा जादुई पिटारा यामधील साहित्याच्या माध्यमातून पूर्वप्राथमिक स्तरावर लेखनपूर्व व गणनपूर्व कृती करून घेण्यात याव्यात.
५. वाचनाची आवड निर्माण करण्याकरिता गोष्टीचा शनिवार या कार्यक्रमाचे जिल्हास्तरावरील संपर्क अधिकारी (नोडल अधिकारी) हे शास्त्रीय पद्धतीने कथाकथन कसे करावे याचे मार्गदर्शन करणारे सत्र घेवू शकतात .

६. विद्यार्थ्यांना वर्गात, शाळेमध्ये समुदायाद्वारे विविध गोष्टीचे ऐकवाव्यात तसेच त्याचे वाचन करावयास लावावे व विद्यार्थ्यांना त्या गोष्टीवर आधारित विविध प्रकारे अभिव्यक्त होण्यास प्रोत्साहन देता येईल.

७. राज्याद्वारे पुरविण्यात आलेल्या विविध अध्ययन साहित्याच्या माध्यमातून (जादुई पिटारा,पीएसइ संच) खेळाधारित अध्ययन /उपक्रम घेण्यात यावे तसेच बाहुलीनाट्याचे सत्र आयोजित करता येईल.

८. शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान यावर आधारित भूमिका अभिनय,नृत्याचे कार्यक्रम तसेच मुळाक्षराची व अंकांची गाणी ,विविध मुळाक्षराच्या व भौमितिक आकृत्याच्या रांगोळ्या,भाषा व गणित विषयातील संकल्पनेवर आधारित वर्ग सजावटी,पोस्टर निर्मिती यासारख्या कला व हस्तकौशल्य निगडीत कृतीचे प्रदर्शन भरविण्यात यावे व याबाबत पालकांमध्ये पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान यामध्ये कला व हस्तकौशल्याचा समावेश का करण्यात आला आहे या संदर्भाने जाणीव जागृती करता येवू शकते .

९. पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान याची उदिष्टे ,महत्व व जाणीव जागृती या अनुषंगाने पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान यावर आधारित खालील लिंक वर उपलब्ध करून देण्यात आलेल्या चित्र फितीचे प्रक्षेपण करण्यात यावे.

१.https://www.youtube.com/watch?v=SOzerRQJmXq&ab%20channel=NCE%20RTOFFICIAL

२.https://www.voutube.com/watch?v=1%20HhhPPhQJdA&ab%20channel=NCE%20RTOFFICIAL

१०. शाळेमधील ग्रंथालयातील पुस्तके स्तरनिहाय विद्यार्थ्यांना देण्यात यावीत व शाळेच्या सकाळच्या सत्रामध्ये घड्याळी एक तास वाचन तासिका घेण्यात यावी .

११.पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान या संदर्भाने निर्माण केलेले साहित्य व तदनुषंगिक बाबीच्या साह्याने पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मेळाव्याचे आयोजन करण्यात यावे.

१२. पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान या अभियानाचा प्रचार व प्रसार होण्यासाठी निपुणोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी प्रस्तुत कार्यालयातील गणित या विभागामार्फत दि.९ फेब्रुवारी २०२४ रोजी निर्गमित करण्यात आलेले पत्र यामधील उपक्रमांचा देखील समावेश करता येईल .

**समुदायाचा सहभाग :**

Scanned with OKEN Scanner

- शाळांच्या माध्यमातून तयार करण्यात आलेले माता पालक गटांचा शाळेतील सदर उपक्रमात सक्रीय सहभाग घेण्यात यावा .

- उपरोक्त नमूद मुद्दा क्रमांक ८,११ यामध्ये नमूद बाबीनुसार उपक्रमाचे आयोजन करून पालक व समुदायाचा सक्रीय सहभाग घेण्यात यावा .

Scanned with OKEN Scanner

## परिशिष्ट-३

# शिक्षा सप्ताह: शैक्षणिक उत्कृष्टतेचा उत्सव
## तिसरा दिवस
## बुधवार दि. २४ जुलै २०२४
## क्रीडा दिन

नवीन राष्ट्रीय धोरण (NEP 2020) मध्ये खेळांना शालेय अभ्यासक्रम व क्रीडा आधारित अध्ययन याचा महत्त्वपूर्ण भाग असल्याचे नमूद करण्यात आले आहे. नवीन राष्ट्रीय धोरणात स्वदेशी खेळांना अनन्यसाधारण महत्त्व देण्यात आले आहे. या खेळांच्या माध्यमातून देशाची संस्कृती, लोककला यांचा परिचय उत्तम रितीने होऊ शकतो असे या धोरणात अधोरेखित करण्यात आले आहे.

या अनुषंगाने केंद्र शासनाच्या शिक्षण मंत्रालयातील शालेय शिक्षण व साक्षरता विभागाने २१ ऑगस्ट २०२३ रोजी मार्गदर्शक सूचना विकसित केल्या आहेत.

**उद्दिष्ट्ये:-** विद्यार्थ्यांच्या पायाभूत अवस्थेपासूनच खेळ आणि फिटनेसचे महत्त्व पटवून देणे यासाठी-

१. खेळ आणि तंदुरुस्तीच्या महत्त्वाबद्दल जागरुकता वाढविणे.

२. समकालीन खेळांच्या समांतर देशी खेळांना प्रोत्साहन देणे.

३. तरुणांच्या मनात सांघिक भावना आणि शिस्तीची भावना जागृत करणे.

४. राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढवणे

५. खेळ हा विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवणे.

६. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी. (विशेषतः भारताचे स्वदेशी खेळ)

७. विद्यार्थ्यांमध्ये अभिमान, खिलाडूवृत्ती आणि नैतिक वर्तनाची सकारात्मक वृत्ती विकसित करणे

८. विद्यार्थ्यांना शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि भावनिकदृष्ट्या तंदुरुस्त बनवणे.

९. विविध सामाजिक आणि आर्थिक पार्श्वभूमीच्या व्यक्तींना एका सामायिक व्यासपीठावर एकत्र आणून विद्यार्थ्यांमध्ये सांघिक भावना वाढवणे.

१०. खेळातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक व नैतिक मूल्ये रुजविणे.

शिक्षण सप्ताहाच्या तिसऱ्या दिवशी शपथ घेतली जाणार आहे. त्यामध्ये स्वदेशी खेळांना प्राधान्य द्यावे असे म्हटले आहे. या अनुषंगाने पुढील मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करावा.



Scanned with OKEN Scanner

- शालेय स्तरावर पहिल्या सत्रातील १ ते २ तासामध्ये विद्यार्थ्यांसाठी विविध स्वदेशी खेळांचे आयोजन करावे.
- इयत्ता १ ली ते ५ वी साठी सापशिडी, पत्ते, शर्यत, गोट्या, सागरगोटे, भोवरा, टिपरी, लगोरी, लंगडी, फुगडी, आंधळी कोशिंबीर, चमचा लिंबू, सुई दोरा, दोरीवरच्या उड्या अश्या प्रकारचे खेळ घ्यावेत.
- इयत्ता ६ वी ते १२ वी साठी बुद्धिबळ, सारीपाट, खो-खो, कबड्डी, विटी दांडू, भालाफेक, मल्लखांब, धावणे शर्यत, लंगडी, लगोरी, ३ पायांची शर्यत, लांब उडी व उंच उडी, लेझीम, हे खेळ घ्यावेत
- तसेच यासाठी केंद्र शासनाने दिलेल्या ७५ स्वदेशी खेळांची यादी सोबत जोडण्यात आली आहे. स्वदेशी खेळ परिस्थितीनुसार सहजगत्या खेळता येणाऱ्या खेळांची निवड केली जावी.
- शक्य झाल्यास स्थानिक खेळांच्या स्पर्धा आयोजित केल्यास त्यात विजयी होणाऱ्या संघांचा, खेळाडूंचा यथोचित सन्मान केला जावा.
- स्वदेशी खेळांच्या आयोजनादरम्यान स्थानिक खेळाडू , शाळा व्यवस्थापन समितीतील सदस्य सहभागी होतील याची दक्षता घ्यावी.
- पालक आणि नागरी समाज संस्था यांचे मदत घेण्यात यावी.
- सदर उपक्रमामध्ये विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांचा देखील समवेश करण्यात यावा.

**अपेक्षित परिणाम:-**

विद्यार्थी आणि समाज यांच्यात खेळाच्या महत्त्वाविषयी अधिक चांगली समज निर्माण होईल.
विद्यार्थ्यांच्या मनामध्ये खेळाची भावना विकसित होईल.
वर्गाबाहेरील शिक्षणाचा अनुभव येईल.
विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, तंदुरुस्ती, निष्पक्षता, संघकार्य आणि एकता ही मूल्ये रुजविली जातील.

Scanned with OKEN Scanner

## परिशिष्ट-४

## शिक्षा सप्ताह: शैक्षणिक उत्कृष्टतेचा उत्सव

## दिवस चवथा

## गुरुवार दि. २५ जुलै २०२४

## सर्व शाळांमध्ये २५ जुलै २०२४ रोजी सांस्कृतिक दिन साजरा करणे.

NEP २०२० मध्ये विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षक यांच्या विकासासाठी भारतीय कला आणि संस्कृतीची शिफारस करण्यात आली आहे. २२-२८ जुलै २०२४ दरम्यान शिक्षा सप्ताहाचा चौथा दिवस म्हणजेच दि. २५ जुलै २०२४ रोजी देशातील सर्व शाळांमध्ये सांस्कृतिक दिन म्हणून साजरा केला जावा. हा दिवस भारताच्या सांस्कृतिक विविधतेला प्रोत्साहन देण्यासाठी साजरा करण्यात यावा.

### सांस्कृतिक दिनाची उद्दिष्टे

१. सांस्कृतिक दिवसांमध्ये विविधता, जागतिक जागरुकता, परस्पर आदर, सर्जनशीलता, अंतर्दृष्टी आणि सामुदायिक भावनेच्या प्रचार करणे.
२.कला आणि संस्कृतीच्या विविध उपक्रमांद्वारे शालेय वातावरणाला चैतन्यमय आणि आनंददायक बनविणे.
३. शालेय समुदायातील प्रत्येक सदस्य किंवा शिक्षक आणि इतर कर्मचाऱ्यांच्या कलागुणांना आणि सर्जनशीलतेला वाव देण्यासाठी एक योग्य व्यासपीठ प्रदान करणे.

हा उपक्रम सुसंवाद आणणे, विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यातील दरी कमी करणे, विविध सांस्कृरिक परंपरांचे कौतुक करणे, अभिव्यक्तीला चालना देणे, सौहार्दपूर्ण वातावरणास प्रोत्साहन देणे आणि कोणत्याही निर्बंधांशिवाय कलेच्या विविध अभिव्यक्तीद्वारे विविधता साजरी करणे या दिशेने देखील प्रयत्न करेल.

त्यासाठी पुढील मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करावा.

- शाळांमध्ये विविध भाषा, वेशभूषा, खाद्यपदार्थ, कला, वास्तुकला, स्थानिक खेळ, चित्रकला, नृत्य, गाणी, नाट्य, लोक आणि पारंपारिक कला, पथनाट्य (नुक्कड नाटक), कठपुतळीचे कार्यक्रम, कथा-कथन यासारख्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे.
- लोक, प्रादेशिक आणि समकालीन शैली किंवा देशाच्या कोणत्याही भागातून नाटकातील इतर कोणतेही उपक्रम, सामुदायिक गायन, लोकनृत्य, शास्त्रीय आणि प्रादेशिक लोकप्रकार इ. कलाप्रकारांतून विद्यार्थ्यांच्या प्रतिभेचे संगोपन आणि प्रदर्शन केले जावे.
- स्थानिक आणि पारंपारिक कलाकार/कारागीर आणि कलाकारांना शाळेत त्यांचे कला प्रकार प्रदर्शित करण्यासाठी आमंत्रित करावे. किंवा शाळा स्थानिक कलाकार/कारागीर आणि कलाकारांशी संवाद साधण्यासाठी भेटींचे आयोजन देखील करू शकतात.

Scanned with OKEN Scanner

- संपूर्ण शाळेत पेंटिंग डे किंवा शाळेच्या परिसराचे संकल्पनेवर आधारित सुशोभीकरण आयोजित करावे. जेथे सर्व मुले आणि कर्मचारी सदस्य त्यांच्या आवडीच्या रंग आणि माध्यमांसह काम करण्याचा आनंद घेऊ शकतात.
- सदर उपक्रमामध्ये सहभागी होण्यासाठी शाळा परिसरातील नागरिकांना आमंत्रित करू शकतात. स्थानिक सांस्कृतिक संस्था जसे की बाल भवन आणि बाल केंद्र, पुरातत्व स्थळे, विविध प्रकारची संग्रहालये इत्यादींचे सहकार्य घेण्यात यावे.

## उत्सवासाठी मार्गदर्शक तत्त्वे

१.राज्य/संघ शालेय शिक्षण विभागाच्या जिल्हा अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली उपक्रम राबवले जातील. तथापि, अशा उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शाळेच्या मुख्याध्यापकांचा सक्रिय सहभाग असावा.

२. सर्व राज्ये/केंद्रशासित प्रदेशांनी हे सुनिश्चित केले पाहिजे की उत्सव नाविन्यपूर्ण, सर्जनशील असावा

३.सर्व राज्ये/केंद्रशासित प्रदेशांनी कोणाच्याही भावना दुखावल्या जाणार नाहीत आणि मानवी हक्कांचे उल्लंघन होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे

४.विशेष गरजा असलेल्या मुलांचा (CWSN) सहभाग लक्षात घेऊन सर्व कार्यक्रमांची रचना करण्यात यावी.

Scanned with OKEN Scanner

**परिशिष्ट क्र. ५ अ**

**शिक्षण सप्ताह**

**दिवस पाचवा**

**शुक्रवार दि. २६ जुलै २०२४**

**कौशल्य दिवस**

**सक्षम आणि स्पर्धात्मक कार्यबळ तयार करण्यासाठी कौशल्य शिक्षण**

**प्रस्तावना**

शिक्षणाबद्दल जागृती व महत्व अधोरेखित करण्यासाठी **शिक्षा सप्ताह** हा कार्यक्रम या वर्षी भारतात साजरा करण्यात येत आहे.देशाच्या सर्वांगीण विकासात कौशल्य शिक्षणाची महत्वपूर्ण भूमिका अधोरेखित करण्यासाठी या आठवड्यात एक दिवस कौशल्य शिक्षणाबाबत विविध उपक्रम घ्यावयाचे आहे. या उपक्रमांतर्गत एक दिवस कौशल्य आणि डीजीटल शिक्षण यांतर्गत विविध उपक्रमाद्वारे २१ व्या शतकातील क्षमता व कौशल्य विद्यार्थ्यांमध्ये साध्य करून त्यांना सक्षम करू शकतो.

कौशल्य शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यामध्ये रोजगारक्षमता वाढते ,व्यक्तिमत्व विकास होतो व आत्मविश्वास वाढण्यास मदत होते. विद्यार्थ्यामध्ये कौशल्य निर्मिती अभ्यासक्रमामुळे त्यांना नेमके काय करायचे आहे याची दिशा मिळते,त्यांच्या करिअर मध्ये प्रगती करण्यास सहाय्य मिळते, उद्योजकीय कौशल्य निर्माण होऊन रोजगार निर्मिती करता येते. यामुळे देशाच्या आर्थिक व्यवस्थेत प्रत्येक विद्यार्थी योगदान देऊ शकतो. विद्यार्थ्यामधील क्षमता व आवडीनुसार त्यांच्यामध्ये कौशल्य निर्मिती केल्यास व्यवसाय शिक्षणाचे उद्दिष्ट मोठ्या प्रमाणात साध्य होऊ शकतात.

**पार्श्वभूमी**

भारताची तरुण व उत्पादक वर्गातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता त्यांना भविष्यवेधी कौशल्यासंबंधी सक्षम करणे आवश्यक आहे. राष्ट्रीय राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ ,शैक्षणिक धोरण २०२०,राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २०२३ यामध्ये शिक्षणासोबत कौशल्य विकसनाच्या महत्वावर भर देण्यात आलेला आहे . याची अंमलबजावणी करण्यासाठी या कार्यक्रमातील एक दिवशी विविध उपक्रमांचे आयोजन विशेषत्वाने करायचे आहे.यामुळे विद्यार्थ्यांना विविध कौशल्यांची ओळख करून देऊन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चे सर्वांगीण विकासाचे उद्दिष्ट साध्य करणे शक्य होईल.

**याची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत :**

१) जागृकता वाढविणे : यांतर्गत विद्यार्थ्यांना विविध उपलब्ध कौशल्ये याबाबत माहिती द्यावयाची आहे.

२) सेतू निर्माण करणे - शैक्षणिक व व्यावसायिक अभ्यासक्रम यातील अंतर कमी करण्यासाठी तज्ञ प्रशिक्षक, संस्था आणि नियोक्ते याबाबत माहिती उपलब्ध करून देणे यात अपेक्षित आहे

३) आवड निर्माण करणे -पारंपारिक व्यवसायाच्या पलीकडले व्यवसायाचे मार्ग शोधण्यास विद्यार्थ्यांना प्रेरित करणे यात अभिप्रेत आहे.

४) यशोगाथा - कौशल्य शिक्षणातून समाजात यशस्वी योगदान देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या यशोगाथेचा प्रसार यातून केला जाणार आहे .

कौशल्य दिवस या उपक्रमांतर्गत खालील उपक्रमाचे शाळेत अयोजन करता येईल. खाली दिलेल्या उपक्रमाचे आयोजन करताना कोणत्या विद्यार्थी कृतीचा समावेश करता येईल याबाबत सविस्तर वर्णन करण्यात आले आहे.यामुळे विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य प्राप्तीसाठी उपक्रमाचे आधीच नियोजन करणे शक्य होणार आहे . विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य निर्मिती करण्यासाठी खालील उपक्रमांतर्गत अधिकच्या कृतींचा समावेश करता येऊ शकेल.

**१) संवाद कौशल्य ,विक्री कौशल्य व विपणन कौशल्य (marketing) यांची ओळख -**

**उपक्रम** - भूमिकाभिनय

**विद्यार्थी कृती:** यांतर्गत विद्यार्थी संवाद कौशल्य, विक्री कौशल्य संबंधित विविध तंत्रे आणि विपणन धोरण यासंदर्भात कौशल्य विकसित करण्यासाठी भूमिकाभिनय या उपक्रमात सहभागी होतील.

**ग्राहक प्रतिबद्धता व उत्पादन सादरीकरण**

१) यात अभिरूप वातावरणात विद्यार्थी ग्राहकांना सेवा उपलब्धतेबबात माहिती सांगतील
२) सेवा व उत्पादने याबाबत ग्राहकांना प्रभावीपणे माहिती देतील.
३) ग्राहकांच्या गरजेनुरूप सेवा व उत्पादनाचे वैशिट्य सांगतील

**आक्षेप हाताळणे व विक्रीबाबत योग्य निवड उपलब्ध करून देणे -**

१) विद्यार्थी ग्राहकांचे आक्षेप अभिरूप वातावरणात आत्मविश्वासपूर्वक हाताळतील
२) ग्राहकांना खरेदीचा योग्य निर्णय घेण्यासाठी मन वळवण्याच्या तंत्राचा वापर करून विक्रीसाठी उपलब्ध पर्याय सांगतील.

***ग्राहक ओळख व निश्चितीकरण व बाजार संशोधन**

१) विद्यार्थी लोकसंख्याशास्त्र ,मानसशास्त्र ,वर्तनावर आधारित वस्तू खरेदी करणाऱ्या ग्राहकांचा लक्ष्य गट निश्चित करतील

२) विद्यार्थी ग्राहकांची प्राधान्ये ,स्पर्धकांचे विश्लेषण समजून घेण्यासाठी बाजार संशोधन करतील .

**मॉक मार्केटिंग कॅम्पेन डेवलपमेंट**

१) विद्यार्थी शाळेतील उपक्रम ,कार्यक्रम याबाबत माहिती देण्यासाठी मॉक मार्केटिंग मोहिमेत सहभागी होतील
२) पोस्टर्स ,फ्लायर्स ,मिडिया पोस्ट्स यासारखी प्रचारात्मक सामग्री विद्यार्थी तयार करतील

३) लक्ष्यगट ग्राहकांना आकर्षित करण्यास व खरेदीप्रक्रियेत गुंतवून ठेवण्यास आकर्षक जाहिराती व विविध धोरणाची आखणी विद्यार्थी करतील

**२) सांस्कृतिक व ऐतिहासिक जागृती**

**उपक्रम** -ऐतिहासिक स्थळाला भेट

**कौशल्य** -ऐतिहासिक जागृती ,सांस्कृतिक समज ,निरीक्षण व विश्लेषण

**विद्यार्थी कृती:**

१) या उपक्रमातून विद्यार्थी एखाद्या ऐतिहासिक वास्तुबद्दलचा संपन्न वारसा ,व विशिष्ट संसृतिक महत्व याब्त माहिती घेतील

२) विद्यार्थी ऐतिहासिक स्थळ तज्ञ किंवा गाईड यांच्या मदतीने वस्तूबाबत माहिती घेतील.

३) यात विद्यार्थी त्या वास्तूचा इतिहास ,ऐतिहासिक पात्र वास्तुशिल्प वैशिष्ट्ये याबाबत माहिती घेतील

४) विद्यार्थी यात वास्तुशिल्प अभ्यास ,संदर्भ साहित्य अभ्यास आणि सदर वस्तूचा स्थानिक क्षेत्रातील इतिहास व वारसा यावर होणाऱ्या परिणामाबाबत चर्चा करतील

५) ऐतिहासिक वारसाच्या जतन व संरक्षणाचे महत्व ,त्यांचे भूतकाळातील संस्कृती समजून घेण्यात त्यांचे महत्व,समकालीन समाजावर त्याचा होणारा परिणाम याबाबत चर्चा करतील

६) विद्यार्थी विविध गोळा केलेल्या ऐतिहासिक कलाकृती व वस्तू यांच्या संग्रहातून शाळेमध्ये ऐतिहासिक वस्तुसंग्रहालयाचे प्रदर्शन करू शकतील

७) विद्यार्थी ऐतिहासिक व्यक्तींचे योगदान याबाबत त्यांच्या उपलब्ध स्मारकातून माहिती गोळा करतील

८) स्थानिक इतिहासातील महत्वाच्या व्यक्तीचे त्यांचे समाजातील योगदान ,त्यांचे कार्य यावर चर्चा करतील व त्यांच्या सन्मानाचे महत्व समजून घेतील

९) इतिहासात योगदान देणाऱ्या व्यक्ती व वास्तूच्या माहितीतून विद्यार्थी मुल्ये व समाजातील योगदान याबाबत माहिती जाणून घेतील

**३) निसर्ग व शेतीतून अध्ययन**

**उपक्रम**- सेंद्रिय शेती, बागायती रोपवाटिका, कृशिबजार, दुग्ध संकलन केंद्र, पशुपालन प्रशिक्षण केंद्र, सहकारी संस्था, उद्याने, वने, बाग, तळे यांना भेट या उपक्रमांचा समावेश यात करता येईल.

**कौशल्य :** पर्यावरणीय जागरूकता, शोध, सर्जन शीलता

**विद्यार्थी कृती:**

१) विद्यार्थी या उपक्रमांतर्गत शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली उद्दिष्ट पूर्तीसाठी भेट देतील

२ ) विविध वनस्पती, प्राणी, विविधता, सातत्य, नैसर्गिक प्रक्रिया यांचे मुद्देनिहाय निरीक्षण करतील

३) विद्यार्थी सजीवांच्या प्रकारांचे वर्गीकरण, प्राण्यांचे वर्तन, प्राण्यांची राहण्याची ठिकाणे याबाबत निरीक्षण करतील .

४ ) फायदेशीर कीटक व हानिकारक कीटक यांचे वर्गीकरण करतील

**४ ) घरगुती कामातून शिकणे**

**उपक्रम** - स्वयंपाक, स्वच्छता, बागकाम

**कौशल्य** -नियोजन, मोजमाप, वेळेचे व्यवस्थापन, संयम आणि पर्यावरणाची समज स्वयंपाक

१) विद्यार्थी स्वयंपाकातील एखादा खाद्य घटक तयार करण्यासाठी लागणारे साहित्य, पाक कृती, त्यादरम्यान आवश्यक सुरक्षितता नियम, स्वच्छता याबाबत माहिती सांगतील.

२) साफसफाई व स्वच्छता - विद्यार्थी स्वच्छतेचे महत्व विशद करतील, याबाबत शालेय, वर्ग स्वच्छता उपक्रमात सहभाग घेतील.

३) बागकाम -विद्यार्थी, विविध वृक्षांची लागवड,त्याची काळजी, संगोपन, पर्यावरणीय घटकांचा वनस्पतीवर होणारा परिणाम याबाबत उपक्रम राबवतील

**५ ) हॅकेथॉन-**

**उपक्रम- कोडींग स्पर्धा**

**कौशल्य-** समस्या निराकरण, प्रोग्रामिंग, संगणीकरण

**विद्यार्थी कृती:**

१) विद्यार्थी गटामध्ये कोडींग स्पर्धा किंवा अप्लिकेशन तयार करण्यासाठी कार्य करतील.
२) प्रकल्पाचे सादरीकरण करतील

**६ ) प्रसार माध्यम आणि करमणूक**

**उपक्रम- अॅनिमेशन आणि डिजिटली कथा सांगणे.**

**कौशल्य-** संगणकीय विचार, कथा सांगणे, डीजीटल साक्षरता

**विद्यार्थी कृती:**

१) विद्यार्थी स्क्रँच या अप्लीकेशनच्या माध्यमातून कथा तयार करतील.
२) या उपक्रमातून विद्यार्थी कोडींग व ॲनिमेशनचे मुलभूत घटक शिकतील

**७ ) डिझाईन**

**उपक्रम- डिझाईन थिंकिंग कार्यशाळा**

**कौशल्य-** सहानुभूती ,सर्जनशील विचार, समस्या निराकरण

**विद्यार्थी कृती:**

१) या उपक्रमातून विद्यार्थी वर्गाचा नकाशा तयार करतील आणि त्याचा उपयोग इतर उपक्रम राबविण्यासाठी कसा उपयोग होईल याचा विचार करतील.

२) शालेय उपहार गृहातील कचरा कमी करून तेथील जागेचा जास्तीत जास्त उपयोग कसा करता येईल याचा आराखडा विकसित करतील.

३) यांसारख्या उपक्रमाचा यात सहभाग करता येईल.

(विद्यार्थी आनंद वर्गाची भन्नाट कल्पना ,सुधा मूर्ती यांची पुस्तके ,रीडर्स डायजेस्ट इ . यासारख्या पुस्तकांचे वाचन करून out of box विचार करू शकतील) .

**८ ) मातीकाम कौशल्य**

**उपक्रम- मातकामातील विविध कौशल्याची माहिती देणे.**

**कौशल्य-** शारीरिक कौशल्य, सर्जनशीलता, कारक कौशल्य इत्यादी.

**विद्यार्थी कृती:**

१) विद्यार्थी एक कला प्रकार म्हणून मातीच्या वस्तू तयार करणे याचा इतिहास व महत्व याची माहिती घेतील.

२) मातीपासून विविध वस्तू उदा. वाट्या, फुलदाणी तयार करतील.

**९ ) बांबू कला कार्यशाळा-**

**उपक्रम- बांबू हस्तकला**

**कौशल्य-** शारीरिक कौशल्य, सर्जनशीलता, कारक कौशल्य, पर्यावरण जागरूकता इत्यादी.

**विद्यार्थी कृती:**

**A)बांबू क्राफ्ट तंत्र**

१)) आयोजित कार्यशाळेमध्ये बांबू कापणे, आकार देणे आणि जोडणे यांच्या पारंपारिक पद्धतीचा वापर करावयास शिकतील

२) यासाठी चाकू किंवा करवत याचा वापर व त्या दरम्यानची सुरक्षितता यांचे पालन करतील.

३) बांबूच्या वस्तू तयार करण्यासाठी विविध पद्धती शिकतील.

**B)बांबू हस्तकला प्रकल्प**

१) यामध्ये विद्यार्थी बांबूपासून बास्केट, फुलदाण्या, पेन स्टँड यासारख्या वस्तू तयार करतील.

२) या वस्तूंना आकर्षक करण्यासाठी रंगवणे, सजवणे इत्यादीसारख्या विविध तंत्राचा शोध घेतील.

३) बनवलेल्या वस्तूंच्या प्रदर्शनात सहभाग घेतील.

**१० ) पिशवी निर्मिती कार्यशाळा-**

**उपक्रम- चिंध्या पासून पिशव्या बनवणे.**

**कौशल्य-** शिवणकाम, कारक कौशल्य, सर्जनशीलता.

**विद्यार्थी कृती:**

१) या कार्याशाळेमध्ये विद्यार्थ्यांना निरोपयोगी कपड्यांपासून पिशव्या तयार करणेबाबत माहिती दिली जाईल.

२) या उपक्रमातून विद्यार्थ्यांना पिशव्या तयार करण्यासाठी लागणारे साहित्य, तंत्र, विविध प्रकारच्या पिशव्यांचे उपयोग माहिती होईल.

३) विद्यार्थी स्वतः उपलब्ध साधनातून पिशवी तयार करतील.

**११ ) सुरक्षित पाणी**

**उपक्रम- पाणी चाचणी कार्यशाळा.**

**कौशल्य-** वैद्यानिक दृष्टीकोन, निरीक्षण, विश्लेषणात्मक विचार.

**विद्यार्थी कृती:**

१) या उपक्रमातून विद्यार्थी पाण्याची गुणवत्ता तपासण्याची वैद्यानिक पद्धती शिकतील.

२) विविध स्त्रोतातून पाण्याचे नमुने गोळा करून पाण्याची गुणवत्ता तपासतील.

३) विद्यार्थी विविध चाचणी पद्धती, स्वच्छ पाण्याचे महत्व आणि पाणी चाचणीसाठी लागणारे साहित्य याबाबत माहिती घेतील.

४) जवळच्या जलस्त्रोतातील पाणी दुषित करणारे घटक आणि त्यांच्या आरोग्यावरील परिणामांबद्दल माहिती घेतील.
५) या कार्यशाळेत पाणी शुद्धीकरण पद्धतीचे प्रात्यक्षिक याचे निरीक्षण करतील.

**१२ ) मातीची सुपीकता**

**उपक्रम - माती परीक्षण कार्यशाळा.**

**कौशल्य -** वैद्यानिक निरीक्षण, माहिती संकलन, विश्लेषण

**विद्यार्थी कृती:**

१) या कार्यशाळेत विद्यार्थी मातीच्या गुणवत्तेचे परीक्षण करण्याच्या पद्धती जाणून घेतील.
२) कार्यशाळेसाठी विद्यार्थी वेगवेगळ्या ठिकाणातून मातीचे नमुने गोळा करून आणतील.
३) माती परीक्षण कीट वापरून मातीचा पोत, PH पातळी, पोषक घटक यांचे विश्लेषण करतील.

**१३ ) व्यावसायिक आणि उद्योजकांची भेट**

**उपक्रम - व्यावसायिक आणि उद्योजकांची भेट**

**कौशल्य-** व्यवसाय मार्गदर्शन, सहयोग

**विद्यार्थी कृती:**

१) शालेय अथवा वर्गस्तरावर यशस्वी व्यावसयिक किंवा उद्योजक यांच्या व्याख्यानातून त्यांचा व्यवसायाचा प्रवास जाणून घेतील.
२) व्यावसायिकांच्या व्यवसाया दरम्यान आलेले अडथळे व त्यावर केलेली मात, टिकवलेले सातत्य याबाबत माहिती घेतील.
३) यशस्वी व्यवसायासाठी आवश्यक कौशल्यांची माहिती घेतील.

**१४ ) प्रथमोपचार कार्यशाळा**

**उपक्रम- प्रथमोपचार कार्यशाळा**

**कौशल्य-** गट कार्य, आरोग्य रक्षण, चिकित्सक विचार

**विद्यार्थी कृती:**

१) विद्यार्थी प्रथमोपचार कार्यशालेमध्ये एखादा अपघात झाल्यास उदा. गुदमरणे, बेशुद्ध होणे कोणता प्रथमोपचार करावा याचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण घेतील.

२) विद्यार्थी प्रथमोपचार तंत्राचा वापर करण्यासाठी वैद्यकीय तज्ञाद्वारे माहिती घेतील व पुतळ्यावर त्याचे प्रत्यक्षिक करून बघतील.

- **कौशल्य शिक्षण दिवस उपक्रमांतर्गत खालील घटकांचा सहभाग घेण्यात यावा.**

१) इयत्ता ६ वी ते १२ वी चे विद्यार्थी
२) पालक आणि शिक्षक
३) व्यावसायिक समुपदेशक
४) उद्योग प्रतिनिधी
५) शालेय प्रशासनातील घटक
६) शालेय शिक्षणाशी संबंधित व्यक्ती

- **सदर कौशल्य विषयक उपक्रम राबवण्यासाठी खालील संस्थांचे सहकार्य घेता येईल.**

१) राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ
२) राष्ट्रीय व्यावसयिक शिक्षण आणि प्रशिक्षण परिषद
३) PSS सेन्ट्रल इंस्तीत्युट ऑफ व्होकेशनल एज्युकेशन
४) सेक्टर स्कील कौन्शील
५) स्थानिक उद्योग संस्था
६) संबंधित शिक्षण संस्था.

- **संबधित उपक्रमांचा प्रसार :-**

शाळा, समाज माध्यम, स्थानिक प्रसार माध्यम द्वारे संबधित उपक्रमांचा प्रसार करण्यात यावा.

- **अध्ययन निष्पत्ती :-**

१) विद्यार्थी पालक आणि शिक्षकांमध्ये कौशल्य शिक्षणाबाबत जागरुकता आणि आवड निर्माण होईल.

२) व्यावसायिक व कौशल्य शिक्षणाच्या माध्यमातून विविध उपलब्ध व्यवसायांची माहिती विद्यार्थ्यांना उपलब्ध होईल.

३) शैक्षणीक संस्था, उद्योग संस्था, व्यवसाय शिक्षण संस्था यातील साहचर्य वाढीस लागेल.

४) राष्ट्रीय शैक्षणिक धोरणा २०२० चे कौशल्य शिक्षणाचा मुख्य शिक्षणाच्या प्रवाहात समावेश करण्याचे उद्दिष्ट साध्य होईल.

कौशल्य दिवस हा उपक्रम राबविण्यासाठी वरील उपक्रमांचा समावेश करता येईल. याशिवाय उपलब्ध व स्थानिक परिस्थितीनुसार खालील उपक्रमांचा समावेश देखील करता येईल.

| उपक्रम | कौशल्य | वर्णन |
|---|---|---|
| हॅकेथॉन किंवा कोडींग चालेंज | समस्या निराकरण, प्रोग्रामिंग, संगणीकरण | या उपक्रमादरम्यान विद्यार्थी कोडींग आथवा एखादे सोपे अप्लिकेशन तयार करतील.<br>या दरम्यान एकत्रित रित्या गट कार्यातून स्पर्धात्मक पण खेळीमेळीच्या वातावरणातून सहभागी होतील. |
| पर्यावरणात्मक उपक्रम | समस्या निराकरण, विश्लेषण, पर्यावरण जागृती | विद्यार्थी तांत्रिक व अतांत्रिक पध्दतीनी माती व पाणी परीक्षनाच्या पद्धतीबद्दल माहिती घेतील.<br>विघटन आणि कचरा कमी करण्याच्या पद्धतीबाबत माहिती घेतील. |

| | | |
|---|---|---|
| स्थानिक वनस्पती आणि प्राणी | निरीक्षण, वर्गीकरण, पर्यावरणाची जाण | विद्यार्थी ठराविक कालावधीत गट कार्यातून वनस्पती आणि प्राण्यांच्या प्रजातींचे वर्गीकरण करतील. |
| जवळच्या ऐतिहासिक स्थळांना भेट | संस्कृती व इतिहासाबद्दल जाण, समस्या निराकरण, निरीक्षण | विद्यार्थी उपलब्ध वस्तू शिल्पाचे निरीक्षण करून माहिती गोळा करतील.<br>ऐतिहासिक संदर्भ साहित्यावरून माहिती गोळा करतील.<br>भूतकालातील इतिहास व वर्तमानातील समुदाय याबाबत चर्चा करतील.<br>ऐतिहासिक वारसा बद्दलचे महत्व जाणतील. |
| स्थानिक कला किंवा हस्तकला | सर्जनशीलता, कारक कौशल्य | विद्यार्थी विविध स्थानिक कला किंवा हस्तकला यांचेशी संबधित विविध कला कुसारीच्या वस्तू तयार करतात |
| उद्योजकता | सर्जनशीलता, चिकित्सक विचार, समस्या निराकरण | विद्यार्थ्यांना उद्योजकीय जगातील कौशल्य व अनुभव यांबाबत माहिती देण्यासाठी विद्यार्थी, उद्योजक अथवा व्यावसायिकांच्या व्याख्यानात विविध प्रश्न विचारतील. |
| रोबोटिक आणि AI कार्यशाळा | सर्जनशीलता, चिकित्सक विचार, समस्या निराकरण | विद्यार्थी विविध नाविन्यपूर्ण विज्ञान प्रकल्प, विज्ञान प्रदर्शनी मध्ये सहभागी होण्यासाठी तयार करतील. |
| समाजसेवा प्रकल्प | सहानुभूती, संघ कार्य | या उपक्रमांमध्ये बागेची स्वच्छता जेष्ठ नागरिक केंद्र भेट किंवा समाजकार्यास सहाय्यभूत उपक्रमांचे आयोजन केले जाईल. |

| | | |
|---|---|---|
| डिझाईन थिंकिंग . कार्यशाळा | समस्या निराकरण, सर्जनशीलता | या उपक्रमांमध्ये विविध वस्तूंचे उत्पादन करण्याचे डिझाईन किंवा एखादी वस्तू विशिष्ट गरजेच्या पूर्तीसाठी कशा रीतीने वापरता येईल याचा आराखडा विकाशित केला जाऊ शकतो. |
| अनिमेशन आणि डीजीटल कथा सांगणे | संगणक कौशल्य, सादरीकरण कौशल्य, संगणक साक्षरता | या उपक्रमात विद्यार्थ्यांना स्क्रच यासारख्या उपक्रमाची माहिती देता येईल.स्क्राश या अप्लीकेशनचा वापर करून विद्यार्थी कथा तयार करणे व सादरीकरण करणे हे उपक्रम करू शकतील. |
| आर्थिक साक्षरता | आर्थिक साक्षरता, सर्जनशीलता, कारक कौशल्य | या उपक्रमात विद्यार्थी अभिरूप बाजारातून वस्तूंची विक्री-खरेदी उपलब्ध पैशांचे नियोजन याबाबत माहिती घेतील. |
| स्थानिक समस्या | समस्या निराकरण, सर्जनशीलता, प्रश्न कौशल्य | या उपक्रमात विद्यार्थी गात्कार्यातून स्थानिक समस्येचा शोध घेतील<br>सदर समस्या सोडवण्यासाठी चे मार्ग शोधून काढतील. |
| कृषिविषयक कार्यशाळा | नवनिर्मिती, आर्थिक साक्षरता, सर्जनशीलता, कारक कौशल्य | विद्यार्थी कृषिविषयक उपक्रम उदा. पेरणी, क्रापणी इत्यादीविषयक कृषी तंत्राची माहिती घेतील.<br>कृषीसाठी सहाय्यभूत अत्याधुनिक तंत्रज्ञानाची माहिती घेतील.<br>कृषीशी संबधित इतर व्यवसाय, पशुपालन, मत्स्यपालन, दुग्धव्यवसाय याबाबत माहिती घेतील. |

| | | |
|---|---|---|
| मातकाम | नवनिर्मिती, आर्थिक साक्षरता, सर्जनशीलता, कारक कौशल्य | विद्यार्थी मातीपासून वस्तू तयार करण्यासाठीचे घटक व पद्धतीबाबत माहिती घेतील.<br>स्वतः मातीपासून वस्तूंची निर्मिती करतील. |
| वृक्षरोपण | पर्यावरण जागृती, संवेदनशीलता | या उपक्रमात विद्यार्थी, शाळा व समुदायांमध्ये वृक्षरोपण करतील.<br>या उपक्रमात वृक्षांचे महत्व आणि पर्यावरण विषयक उपक्रमाचे महत्व जाणतील. |
| सौदर्य विषयक कार्यशाळा | वयक्तिक स्वच्छता | या उपक्रमात विद्यार्थी सौदर्य आणि आरोग्य यासंबधी त्वचेची, केसांची काळजी आमी मेकअप ची तंत्रे याबाबतची काळजी घेतील.<br>वयक्तिक स्वच्छता आणि तंत्रे याबाबत माहिती घेतील. |
| अन्न विज्ञान | स्वयंपाक कौशल्य | या उक्रमात विद्यार्थी जाम, जेली, लोणची इत्याची बनवण्या बाबतची कौशल्ये शिकतील.<br>अन्न साठवणुकीची प्रक्रिया आणि त्यातील तंत्रे याबाबत माहिती घेतील |
| गृह विज्ञान | स्वयपाक कौशल्य, शिलाई काम, पोषण मुल्य जाण | या उक्रमात विद्यार्थी घरामध्ये करण्यात येणाऱ्या विविध प्रक्रिया उदा. स्वयंपाक, शिलाई काम, स्वच्छता याबाबतची सविस्तर माहिती घेतील. |

वरील उपक्रमांचे शालेय स्तरावर विद्यार्थी संख्या व स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. उपक्रमाचा हेतू विद्यार्थ्यांना कौशल्य प्राप्ती हा असावा.

परीशिष्ट – ५ बी

शिक्षा सप्ताह

दिवस– पाचवा

शुक्रवार दिनांक २६ जुलै २०२४

विषय– शिक्षणात तंत्रज्ञान दिवस

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० ने डिजिटल तंत्रज्ञानाचा शिक्षणाची समानता, सुलभता आणि गुणवत्ता सुनिश्चित करण्यासाठी दूरगामी परिणाम होऊ शकतो हे वास्तव ओळखून, मुद्दा २३.५ मध्ये असे नमूद केले आहे की "शैक्षणिक तंत्रज्ञानाचा वापर अध्यापन-अध्ययन पद्धती आणि मूल्यमापन प्रक्रिया सुधारण्याच्या उद्देशाने असेल." शिक्षकांचा सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास, शैक्षणिक प्रवेश वाढवणे, उपस्थिती, मूल्यांकन इत्यादींशी संबंधित प्रक्रियांसह शैक्षणिक नियोजन, व्यवस्थापन आणि प्रशासन सुव्यवस्थित करणे, यावर भर असेल.

या उद्देशाने दीक्षा प्रणाली व आत्मनिर्भर भारत कार्यक्रमांतर्गत शालेय शिक्षण आणि साक्षरता विभागाकडून १७ मे २०२० रोजी PMe-VIDYA नावाचा एक व्यापक उपक्रम सुरू करण्यात आला, जो डिजिटल/ऑनलाइन/आकाशवाणी द्वारा शिक्षणाशी संबंधित सर्व उपक्रमांना एका व्यासपीठावर आणून गुणवत्तापूर्ण शिक्षणास गती देतो.

शिक्षणात तंत्रज्ञान दिवस कार्यक्रमाची उद्दिष्टे:

१. NEP २०२० मध्ये तंत्रज्ञानावर लक्ष केंद्रित करणे.

२. डिजिटल शिक्षणाचे फायदे सार्वत्रिक करणे.

३. २०० शैक्षणिक टीव्ही चॅनेलचा प्रचार करणे.

४. शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांना कार्यमग्न करणे.

५. सामाजिक माध्यमांवर प्रसिद्धी देणे.

राज्यातील सर्व जिल्ह्यांनी खालीलप्रमाणे उपक्रम आयोजन करून कार्यवाही करावी,

कार्यक्रम तपशील: (CIET, NCERT द्वारे पुरविलेल्या ऑनलाईन स्वरुपात लिंक द्वारे पाहणे)

१. ठिकाण आणि तारीख:

स्थळ: NCERT स्टुडीओ

तारीख: शिक्षा सप्ताहाचा पाचवा दिवस

२. लक्ष गट: शिक्षक (शिक्षक, प्राध्यापक), विद्यार्थी (प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तर), पालक, माध्यम प्रतिनिधी, शैक्षणिक प्रभावक आणि व्लॉगर्स

| अ. क्र. | वेळ | तपशील | | | सूचना |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | स. ९:०० ते - १०:००: | नोंदणी | | | CIET, NCERT द्वारे पुरविलेल्या ऑनलाईन स्वरुपात लिंक द्वारे पाहणे. प्रस्तुत लिंक आपणास नंतर पुरविण्यात येईल |
| ०२ | स. १०:०० ते १०:३०: | उद्घाटन समारंभ | | | |
| ०३ | स. १०:३० - ११:३० | उपक्रमांवर सादरीकरण | | | |
| ०४ | स.११:३० -१२:३० | पॅनेल चर्चा- विषय: "शैक्षणिक पद्धतींमध्ये तंत्रज्ञान समाकलित करणे" | | | |
| ०५ | दु. १२:३० - १:३० | भोजन अवकाश | | | |
| ०६ | दु. १:३० ते ३:०० | परस्परसंवादी कार्यशाळा क्र. १ | परस्परसंवादी कार्यशाळा क्र. २ | परस्परसंवादी कार्यशाळा क्र. ३ | |
| ०७ | दु. ३.०० ते ६.०० | विद्यार्थी यशोगाथा, प्रश्न मंजुषा व समारोप | | | |

या कार्यक्रमा दरम्यान खालील माहिती लाभार्थ्यांशी चर्चा करण्यात यावी,

A दीक्षा (DIKSHA) प्रणाली- हे भारतातील शालेय शिक्षणातील राष्ट्रीय डिजिटल व्यासपीठ असून राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (NCERT) आणि शिक्षण मंत्रालयाचा एक उपक्रम आहे. DIKSHA ची सुरुवात ५ सप्टेंबर २०१७ रोजी करण्यात आली आणि तेव्हापासून ३६

राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी CBSE आणि NCERT द्वारे तसेच करोडो विद्यार्थी आणि शिक्षकांनी हे व्यासपीठ स्विकारले आहे. दीक्षा प्रणालीचे वापरत महाराष्ट्र राज्य नेहमीच अग्रेसर राहिलेले आहे. सध्या दीक्षा प्रणालीवर राज्याकडे खालीलप्रमाणे ई साहित्य अपलोड झालेले आहे (दिनांक १५/०७/२०२४ नुसार)

६. अध्ययन सत्रे- २९.५७ लाख
७. वापरकर्ते- ९.१७ लाख
८. QR Code- १८२२०
९. पाठ्यपुस्तके- ६८५४ (CBSE + State Board, ८ languages)
10. ई-साहित्य- ४०७७७ (Ducument + Interactive Content + Video + YouTube Content + QR codes)

| | |
|---|---|
| Document | 2150 |
| Interactive Content | 1838 |
| Video | 8428 |
| YouTube Content | 10141 |
| Total | 22557 |
| QR Code | 18220 |
| **Grand Total** | **40777** |

शिक्षकांसाठी सूचना -

- दीक्षा (DIKSHA) प्रणाळी वापरासाठी https:7/pmevidya.education.gov.in/diksha.html येथे भेट देवून अधिकची माहिती देण्यात यावी.
- दीक्षा (DIKSHA) प्रणाली वापरासाठी खालील लिंक दाखविण्यात यावी.
  Diksha app download link - https://www.youtube.com/watch?v=KBpxR62QjoQ
- दीक्षा प्रणालीवर राज्याचे योगदान पाहण्यासाठी येथे भेट द्यावी.
  https://drive.google.com/drive/u/1/folders/1B7j9SLCzVnXo76PhNX3b0k1lPPFP6B5e
- याबाबत विद्यार्थी व शिक्षकांसाठी प्रश्नमंजुषा आयोजित करून त्याच्या नोंदी जतन करून ठेवण्यात याव्यात.

B PMeVidya ०५ वाहिन्या - सहसंचालक, CIET, NCERT यांचे पत्र File No.२०.१९/२०२२-२३/eVidya/CIET October ३, २०२२ चे पत्रान्वये देशातील अनेक राज्यांमध्ये (उदा. केरळ, आंध्र प्रदेश, गुजरात) विद्यार्थ्यांसाठी ई- शैक्षणिक साहित्याचे प्रक्षेपण राज्यातील शालेय शिक्षण विभागाच्या स्वतःच्या शैक्षणिक DTH वाहिनी मार्फत करण्यात येते. प्रस्तुत वाहिन्यावर कार्यक्रम प्रसारण करण्यासाठी भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांचे दरम्यान सामंजस्य करार (MoU) ही करण्यात आलेला आहे. यास्तव राज्यासाठी MH ११३, MH ११४, मMH ११५, MH ११६, MH ११७ असे ५ शैक्षणिक DTH वाहिन्या मंजूर झालेल्या आहेत. सध्या ५ शैक्षणिक वाहिन्यांवर प्रस्तुत वाहिन्यांवर इयत्ता १ ली ते १२ वी, शिष्यवृत्ती व सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास यासाठी आवश्यक ई-साहित्य

प्रक्षेपणासाठी दिनांक १५/०६/२०२४ पासून प्रक्षेपण करण्यात आलेले आहे. यात वाहिनी MH ११३ साठी इयत्ता १ ली ते ४ थी, MH ११४ साठी इ. ५ वी ते ७ वी, MH ११५ साठी इ. ८ वी ते १० वी, MH ११६ साठी इ. ११ वी १२ वी , MH ११७ साठी शिष्यवृत्ती व सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास प्रशिक्षण असा आशय दररोज स. ९ ते १२ नियमित प्रक्षेपण करण्यात येतो. तसेच दिवसातील उर्वरित वेळेत दर ३ तासात दिवसभर चक्राकार पद्धतीने पुनर्प्रक्षेपण करण्यात येते. त्याचे नियोजन पुढीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | वाहिनी क्र. | इयत्ता/ क्षेत्र | प्रक्षेपणासाठी आशय | माध्यम | वेळ |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | PMeVIDYA_MH११३ _०१_ MAHARASHTRA | इ. १ ली, २ री, ३ री, ४ थी | सर्व शालेय विषय | मराठी | स. ९ ते १२ नियमित प्रक्षेपण. दर ३ तासात दिवसभर चक्राकार पद्धतीने पुनर्प्रक्षेपण |
| ०२ | PMeVIDYA_MH११४ _०२_ MAHARASHTRA | इ. ५ वी, ६ वी, ७ वी | सर्व शालेय विषय | मराठी | स. ९ ते १२ नियमित प्रक्षेपण. दर ३ तासात दिवसभर चक्राकार पद्धतीने पुनर्प्रक्षेपण |
| ०३ | PMeVIDYA_MH११५-०३ _ MAHARASHTRA | इ. ८ वी, ९ वी, १० वी | सर्व शालेय विषय | मराठी | स. ९ ते १२ नियमित प्रक्षेपण. दर ३ तासात दिवसभर चक्राकार पद्धतीने पुनर्प्रक्षेपण |
| ०४ | PMeVIDYA_MH११६ _०४_ MAHARASHTRA | इ. ११ वी, १२ वी | कला/ विज्ञान/वाणिज्य | मराठी/ इंग्रजी | स. ९ ते १२ नियमित प्रक्षेपण. दर ३ तासात दिवसभर चक्राकार पद्धतीने पुनर्प्रक्षेपण |
| ०५ | PMeVIDYA_MH११७ _०५_ MAHARASHTRA | CPD/इ. ५ वी, ८ वी शिष्यवृत्ती | इ.५ वी, ८ वी शिष्यवृत्ती, कार्यशाळा, प्रशिक्षण, सुलभीकरण | मराठी/ इंग्रजी | स. ९ ते १२ नियमित प्रक्षेपण. दर ३ तासात दिवसभर चक्राकार पद्धतीने पुनर्प्रक्षेपण |

राज्यातील ३५ तंत्रस्नेही शिक्षकांच्या (SRG) मदतीने तात्पुरत्या स्वरुपात ५ शैक्षणिक DTH वाहिन्यावर कार्यक्रम प्रक्षेपणाची कार्यवाही पूर्ण करून महिनावार नियोजन करण्यात आलेले आहे. सध्या दिनांक १५/०६/२०२४ पासून भारत सरकारने BISAC संस्था, अहमदाबाद यांच्या मदतीने वरील ०५ शैक्षणिक DTH वाहिन्यावर कार्यक्रम प्रक्षेपणाची कार्यवाही सुरु केलेली आहे. आपणास प्रस्तुत ०५ शैक्षणिक चॅनेल पुढीलप्रकारे Dish Tv, DTH Tv व यु-ट्यूब द्वारा लाभ घेण्यास उपयुक्त असतील, त्याचा तपशील पुढीलप्रमाणे,

| अ. क्र. | वाहिनी क्र. | इयत्ता/ क्षेत्र | Dish Tv प्रक्षेपण वाहिनी क्रमांक | DTH Tv प्रक्षेपण वाहिनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| ०१ | PMeVIDYA_MH११३_०१_ MAHARASHTRA | इ. १ ली, २ री, ३ री, ४ थी | २११३ | Satellite/ orbital position G-SAT- 15/ 93.5 * East<br>Modulation - 8 PSK/ DVB S-2<br>Rx Frequency- 11130 MHz<br>Polarization- Vertical<br>Symbol rate -29500 KSPS<br>FEC - 3/4 |
| ०२ | PMeVIDYA_MH११४ _०२_ MAHARASHTRA | इ. ५ वी, ६ वी, ७ वी | २११४ | |
| ०३ | PMeVIDYA_MH११५ -०३ _ MAHARASHTRA | इ. ८ वी, ९ वी, १० वी | २११५ | |
| ०४ | PMeVIDYA_MH११६_०४_ MAHARASHTRA | इ. ११ वी, १२ वी | २११६ | |
| ०५ | PMeVIDYA_MH११७ _०५_ MAHARASHTRA | CPD/इ. ५ वी, ८ वी शिष्यवृत्ती | २११७ | |

उपरोक्त ०५ वाहिन्या आपणास खालील यु-ट्यूब लिंक वर क्लिक करून ही पाहण्यास उपलब्ध असतील. आपण वाहिनीनिहाय पुढीलप्रमाणे यु-ट्यूब द्वारा आशय बघून सोबत दिलेल्या ई-मेलवर आपले बहुमुल्य अभिप्राय देवू शकतात.

वाहिनी निहाय यु-ट्यूब लिंक व अभिप्रायसाठी ई-मेल २०२४-२५

| Sr. No. | Name of the Channel | Grade | YouTube Link | Feedback Email |
|---|---|---|---|---|
| 1 | PMeVIDYA_MH११३ _०१_ MAHARASHTRA | 1,2,3,4 | https://www.youtube.com/watch?v=KDG5xTFssm8 | dth.class1_4@maa.ac.in |
| 2 | PMeVIDYA_MH११४ _०२_ MAHARASHTRA | 5,6,7 | https://www.youtube.com/watch?v=X_dMaiuG7ck | dth.class5_7@maa.ac.in |
| 3 | PMeVIDYA_MH११५ -०३ _ MAHARASHTRA | 8,9,10 | https://www.youtube.com/watch?v=iLDuQcZ02UM | dth.class9_10@maa.ac.in |
| 4 | PMeVIDYA_MH११६_०४_ MAHARASHTRA | 11,12 | https://www.youtube.com/watch?v=9kGUoZQSpmQ | dth.class11_12@maa.ac.in |
| 5 | PMeVIDYA_MH११७ _०५_ MAHARASHTRA | CPD/ Scholarship | https://www.youtube.com/watch?v=iqhP10ToO5c | dth.schcpd@maa.ac.in |

उक्तप्रमाणे राज्यासाठी मंजूर ०५ PMeVidya शैक्षणिक वाहिनीसाठी सन २०२४-२५ अंतर्गत इयत्ता १ ली ते १२ वी, सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास व इ. ५ वी, ८ वी शिष्यवृत्ती विषयासाठी दिनांक १५/०६/२०२४ ते ३०/०४/२०२५ दरम्यान महिनानिहाय प्रपत्रे व मासिक वेळापत्रक करून कार्यक्रम प्रक्षेपित करण्यात येणार आहेत. तरी आपण आपल्या कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त शिक्षक, विद्यार्थी, मुख्याध्यापक, पालक, अधिकारी व शिक्षण तज्ज्ञ यांना उपरोक्त ०५ शैक्षणिक चॅनेलचा लाभ घेण्यास आपल्या स्तरावरून आवाहन करण्यात यावे. याबाबत काही अडचणी आल्यास उपरोक्त ई-मेल वर सविस्तर लिहिण्यास आदेशित करण्यात यावे.

**शिक्षकांसाठी सूचना -**

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना PMeVidya शैक्षणिक वाहिनीबाबत अधिक माहितीसाठी https://drive.google.com/file/d/11x7PQSfMtdZB2-

ojIIw7qIIjc2mF6CHtR/view?usp=drivesdk तसेच https://pmevidya.education.gov.in/ येथे भेट देण्यास सांगावे व याबाबत अधिकची माहिती देण्यात यावी

- याबाबत विद्यार्थी व शिक्षकांसाठी प्रश्नमंजुषा आयोजित करून त्याच्या नोंदी जतन करून ठेवण्यात याव्यात.

C दिव्यांग व्यक्तींसाठी सहाय्यक ठरणारे ई-साहित्य - CIET नवी दिल्ली संस्थेमार्फत दिव्यांग व्यक्तींसाठी सहाय्यक ठरणारे अध्ययन-अध्यापन, योगा व इतर विषयातील ई-साहित्य विकसित करून लाभासाठी त्यांना उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. त्याची सविस्तर माहिती https://pmevidya.education.gov.in/cwsn.html या लिंक वर उपलब्ध आहे.

राज्यातील सर्व दिव्यांग विद्यार्थी व शिक्षक यांच्या अध्ययन- अध्यापनात सहाय्य करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने सन २०२३-२४ मध्ये STARS प्रकल्पांतर्गत इयत्ता ४ थी, व ५ वी साठी ५०० ई-साहित्य विकसित केलेले आहेत. त्याची माहिती दीक्षा प्रणाली च्या https://diksha.gov.in/resources/play/collection/do_3140019008288194561409 6?contentType=Collection, https://diksha.gov.in/play/collection/do_314074196208771072180

या लिंक वर व DO ID do_3140019008288194561409 6 या दीक्षा प्रणाली DO ID वर उपलब्ध आहे.

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील लिंक वर भेट देण्यास सांगून अधिकची माहिती देण्यात यावी.
- याबाबत विद्यार्थी व शिक्षकांसाठी प्रश्नमंजुषा आयोजित करून त्याच्या नोंदी जतन करून ठेवण्यात याव्यात.

D Virtual Labs- शिक्षक व विद्यार्थ्यांना गणित, विज्ञान व भाषा विषयातील अनुभवाधिष्टीत अध्ययन-अध्यापन कृतियुक्त पद्धतीने करून क्लिष्ट संकल्पना सोप्या करण्यासाठी CIET नवी दिल्ली संस्थेमार्फत Virtual Lab कार्यान्वित करण्यात आल्या असून इयत्ता ६ वी ते १२ वी साठी गणित, विज्ञान विषयातील ई-साहित्य विकसित करून लाभासाठी त्यांना उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. त्याची सविस्तर माहिती https://diksha.gov.in/virtuallabs.html या लिंक वर उपलब्ध आहे. लवकरच राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे मार्फत ही Virtual Lab कार्यान्वित करण्यात येवून इयत्ता ६ वी ते १२ वी साठी गणित, विज्ञान विषयातील ई-साहित्य विकसित करून लाभासाठी त्यांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील लिंक वर भेट देण्यास सांगून अधिकची माहिती देण्यात यावी.
- याबाबत विद्यार्थी व शिक्षकांसाठी प्रश्नमंजुषा आयोजित करून त्याच्या नोंदी जतन करून ठेवण्यात याव्यात.

E विद्या समीक्षा केंद्र (VSK) - शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय दिनांक १२ मार्च २०२४ नुसार संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या नियंत्रणाखाली “विद्या समीक्षा केंद्र (VSK)” कार्यान्वित करण्यात आलेले आहे. समग्र शिक्षा, स्टार्स प्रकल्प, पी.एम.श्री., मध्यान्ह पोषण आहार अशा केंद्र पुरस्कृत योजनांसह राज्य शासनाद्वारा विभागांतर्गत विविध उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात येते. या योजनांचा लाभ सर्व संबधित घटकांना देण्यात येतो. सदर उपक्रमांचा परिणाम अंतिमतः विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत प्रतिबिंबित होणे गरजेचे असते. अशा परिणामांचे मापन परफॉरमन्स ग्रेडिंग इंडेक्स (PGI), राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण (NAS), राज्य

स्तरावरील संपादणूक सर्वेक्षण (SLAS), नियतकालिक चाचण्या यातून केले जाते. सदरील माहिती संकलन व विश्लेषण करण्यास यंत्रणेतील सर्व घटकांचा श्रम व वेळ खर्च होतो.

विद्यार्थी आपली संपादणूक पातळी वाढविण्यासाठी, शिक्षक आपला व्यावसायिक विकास करण्यासाठी व प्रशासन पर्यवेक्षणात सुधारणा करण्यासाठी विविध अध्ययन सामुग्रींचा,प्रशिक्षणांचा व डीजिटल साधनांचा नियमित उपयोग करीत असतात. तथापि, यातील परिणाम देणारे घटक कोणते याचे विश्लेषण डेटा अभावी करता येत नाही.

आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) व मशीन लर्निंगच्या मदतीने माहिती संकलन व विश्लेषण प्रक्रिया अधिक वेगवान व सुलभ व्हावी. प्राप्त डेटा विश्लेषणाच्या आधारे राज्यातील शाळा, केंद्र, तालुका, जिल्हा व राज्य स्तरावरील शैक्षणिक स्वास्थ्याचे अचूक निदान करता यावे, प्रत्येक स्तरावरील गरजांची निश्चिती करून शिक्षण व्यवस्थेत सुधारणा होण्यासाठी नेमकेपणाने कृती कार्यक्रमांचे नियोजन, प्रभावी अंमलबजावणी व अचूक मूल्यमापन करता यावे, यासाठी –विद्या समीक्षा केंद्र (VSK) कार्यान्वित करण्यात आले आहे.

**विद्या समीक्षा केंद्राची उद्दिष्टे:**

- समग्र शिक्षा व स्टार्स प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रम/ प्रकल्पांचे Real time संनियंत्रण करणे.
- शैक्षणिक व भौतिक उपक्रम / योजनांचा राज्य स्तरावरून मागोवा घेणे आणि क्षेत्रीय अधिकारी व शिक्षक यांचे डेटा आधारित निर्णय घेण्यासाठी सक्षमीकरण करणे.
- प्रवेशित विद्यार्थी, शालाबाह्य विद्यार्थी, गळती झालेले विद्यार्थी, मुक्त शिक्षण घेणारे विद्यार्थी, शिक्षणाच्या प्रवाहात समाविष्ट बालकामगार, CWSN विद्यार्थी, व्यावसायिक शिक्षण घेणारे विद्यार्थी, गणवेश व पाठ्यपुस्तक वितरण, शिष्यवृत्ती, आर्थिक लाभाच्या योजना, शाळास्तरावरील मूल्यमापन, विद्यार्थी व शिक्षक यांना आवश्यक मदत, प्रोत्साहन व पुरस्कार इ. बाबींवर लक्ष ठेवणे.
- विद्यार्थ्यांची संपादणूक पातळी वाढविण्यासाठी व उपलब्ध संसाधनांचा प्रभावी वापर करण्यासाठी शिक्षकांना मदत करणे.
- डेटा आधारे तातडीने लक्ष देण्यासाठीची गरजा क्षेत्रे निश्चित करून निर्णय घेण्यासाठी मदत करणे.
- शिक्षण व्यवस्थेस पूरक ठरणाऱ्या सर्व संबंधितास माहिती, जागरुकता आणि मदत करण्यासाठी राज्यस्तरावर हेल्प डेस्क तयार करणे.
- सुनिश्चित शाळा मानकांनुसार शाळांची सद्यस्थिती व सुधारात्मक कामगिरीचा Real Time माहिती दर्शविणारा डॅशबोर्ड विकसित करणे.
- राज्यातील सर्व पर्यवेक्षीय यंत्रणेतील समन्वय वाढवून त्यांची कार्यक्षमता आणि परिणामकारकता वाढवणे.
- राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रम / योजना / प्रकल्पांचे Real time संनियंत्रण करणे.
- समग्र शिक्षा, स्टार्स प्रकल्प, पी.एम.श्री. तसेच शासनाचे विविध उपक्रम / योजना / प्रकल्पांचे वार्षिक कार्ययोजना व अंदाज पत्रक तयार करण्यास व शासन स्तरावर धोरण निश्चितीस मदत करणे.
- शिक्षण व्यवस्थेतील सर्व संस्थांच्या लेखा व वित्त विषयक बाबींचे डॅशबोर्ड विकसित करून संनियंत्रण करणे.

प्रस्तुत “विद्या समीक्षा केंद्र (VSK)” राज्यात प्रभावीपणे अंमलबजावणीसाठी व कार्यान्वयन बावत सद्या राज्यामार्फत Chatbot प्रणालीद्वारे नियतकालिक चाचण्या (PAT) आयोजन, विद्यार्थी ऑनलाईन उपस्थिती संकलित करून dashboard उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

नियतकालिक (PAT) २०२३-२४ चाचणीचा तुलनात्मक अहवाल https://app.powerbi.com/view?r=eyJrIjoiYjZjZTQxMTktMTIwNC00MTJmLWJkMDMtYzMyM2M3OGM1M2MzIiwidCI6Ijc2Yjk4ZjVhLTI0NGUtNDg5NS05ZGU5LTY0OTgyYTc3MmYwOCJ9 या chatbotचे dashboard लिंक वर उपलब्ध आहे.

- यात क्षेत्रीय अधिकारी आपल्या जिल्हानिहाय माहिती शोधून, त्यावर आपल्या अधिनस्त अधिकाऱ्यांशी चर्चा करून योग्य प्रकारची उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.
- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील लिंक वर भेट देण्यास सांगून अधिकची माहिती देण्यात यावी.
- याबाबत विद्यार्थी व शिक्षकांसाठी प्रश्नमंजुषा आयोजित करून त्याच्या नोंदी जतन करून ठेवण्यात याव्यात.

## परिशिष्ट क्र. ६

## शिक्षा सप्ताह, दिवस सहावा वार शनिवार दि. २७/०७/२०२४

**Eco clubs for Mission LIFE Day**

शाळेमध्ये नवीन **इको क्लब** स्थापन करणे आणि #Plant4Mother या अभियान अंतर्गत विद्यार्थी, त्यांची माता आणि धरणीमाता यामधील नाते मजबूत होण्यासाठी शाळेत वृक्षारोपण **मोहीम** या दोन्ही उपक्रमांचे **शनिवार दि.२७/०७/२०२४** रोजी आयोजन करणे.

**अ) शाळेमध्ये Eco clubs for Mission LIFE या थीम अंतर्गत #Plant4Mother अभियान आयोजित करण्यासाठी सूचना**

- **वृक्षारोपण मोहिमेचे दि.२७/०७/२०२४** रोजी शाळांनी वृक्षारोपण मोहिमेचे आयोजन करावे. शालेय परिसर, घर,सार्वजनिक ठिकाणे आणि मोकळ्या जागेत वृक्षारोपण करावे. शक्य झाल्यास जंगलतोड झालेल्या ठिकाणी ही विशेष मोहीम राबविण्यात यावी. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार **प्रत्येक शाळेने किमान ३५ रोपे** लावावीत.
- **विद्यार्थी आणि त्यांच्या मातांचा सक्रिय सहभाग :-** विद्यार्थी आणि त्यांच्या मातांचे गट करावेत आणि त्या गटामार्फत एकत्रित रोपे लावावीत. यामुळे विद्यार्थी, त्यांची माता आणि आजूबाजूचे पर्यावरण यामधील नाते मजबूत होईल.
- **नावांचे फलक लावणे :-** विद्यार्थी आणि त्यांच्या मातांच्या नावांचा फलक त्यांनी लावलेल्या रोपाजवळ लावावा.
- **रोपाचे संगोपन करण्यासाठी जबाबदारी देणे :-** विद्यार्थ्यांना त्यांनी लावलेल्या रोपांचे संगोपन करण्यासाठी इको क्लबचे शिक्षक/अध्यक्ष/सदस्यांनी आवश्यक मार्गदर्शन करावे. विद्यार्थ्यांमध्ये रोपाचे संगोपन करण्यासाठी आवश्यक जबाबदारीची जाणीव निर्माण होण्यासाठी त्यांनी लावलेल्या रोपांना पाणी, पोषण आणि प्रतिकूल हवामानापासून संरक्षण मिळेल याची खात्री करावी.

**वरील उपक्रमाच्या अनुषंगाने-**

**१. जिओटॅग केलेले फोटो अपलोड करणे -** शाळांनी वृक्षारोपण मोहिमेचे जिओटॅग केलेले फोटो, सहभागी विद्यार्थी आणि लावलेल्या रोपांची संख्या शिक्षण मंत्रालय, शालेय शिक्षण व साक्षरता विभाग, भारत सरकार यांच्या खालील गुगल ट्रॅकर लिंकवर अपलोड करावेत. https://docs.google.com/spreadsheets/d/13mep-nPOg8gmyX5HR4D1Swob_0ztSgb15eQRBNrFMwo/edit?gid=15896978#gid=15896978

**२. सोशल मीडियावर व्यापक प्रसिद्धी देणे -** या मोहिमेबद्दल समाजात जाणीवजागृती होण्याच्या व इतरांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने शाळांनी या दिवशी घेतलेल्या कार्यक्रमाचे फोटो #Plant4Mother आणि #एक पेड़ माँ के नाम हे हॅशटॅग वापरून सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर अपलोड करावेत.

Scanned with OKEN Scanner

**ब) शाळांमध्ये मिशन लाइफसाठी नवीन इको क्लब स्थापन करण्याबाबतच्या सूचना**

शाळांमधील मिशन लाइफसाठी इको क्लब विद्यार्थ्यांना अर्थपूर्ण पर्यावरणपूरक उपक्रम आणि प्रकल्प करण्यासाठी सक्षम करतात. हा एक मंच आहे ज्याद्वारे विद्यार्थी त्यांच्या पालकांशी आणि परिसरातील समूहांच्या मदतीने पर्यावरणाला अनुकूल व जबाबदार वर्तनशैलीला प्रोत्साहित करते. इको क्लब हे विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमातील, पर्यावरणविषयक संकल्पना आणि कृती जाणून घेण्यास सक्षम करतात. केंद्राच्या निर्देशानुसार राज्यातील ८२३२ शासकीय शाळा व CBSE व इतर व्यवस्थापनाच्या ५३८६ शाळांनी इको क्लबची स्थापना करावी.

- **मिशन लाइफसाठी इको क्लबची स्थापना:** विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणविषयक जागरूकता वाढवण्यासाठी ज्या शाळांमध्ये इको क्लबची स्थापना केलेली नसेल त्या उर्वरित सर्व व्यवस्थापन व सर्व माध्यमांच्या शाळांनी मिशन लाइफसाठी इको क्लब स्थापन करावेत आणि इको क्लब पोर्टलवर नोंदणी करावी.
- **नेतृत्व :-** शाळेचे मुख्याध्यापक हे मिशन लाइफसाठी इको क्लबचे प्रमुख/मार्गदर्शक असतील आणि इको क्लब अंतर्गत सर्व उपक्रमांचे आणि शैक्षणिक प्रगतीची देखरेख करतील.
- **समन्वयकाची जबाबदारी :-** मिशन लाइफसाठी इको क्लबचे समन्वयक म्हणून कामकाज करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक यांनी शाळेतील पदव्युत्तर शिक्षक (PGT) किंवा प्रशिक्षित पदवीधर शिक्षक (TGT) यांची नियुक्ती करावी. या शिक्षकाकडे इको क्लबच्या दैनंदिन कामकाज आणि समन्वयकाची जबाबदारी देण्यात यावी. हे समन्वयक इको क्लबचे प्रकल्प, शैक्षणिक कार्यक्रम आणि सहभागी यांच्या तपशीलवार नोंदी ठेवून नियमितपणे शाळेच्या मुख्याध्यापकांना पुनरावलोकनासाठी सादर करतील.

**मिशन लाइफसाठी इको क्लबची रचना-**

- इको क्लबमध्ये **प्रत्येक इयत्तेतील ४-५ विद्यार्थी** असतील.
- मिशन लाइफसाठी क्लबचे **इको अध्यक्ष** म्हणून एका विद्यार्थ्याची नियुक्ती केली जाईल
- **शाळा व्यवस्थापन समिती (SMC) सदस्य आणि इतर कर्मचारी** सदस्यांना इको क्लबच्या उपक्रमांमध्ये सहभागी होण्यास आणि त्यांना पाठिंबा देण्यास प्रोत्साहित करावे.
- **ऊर्जा संवर्धन, जलसंधारण, कचरा व्यवस्थापन** इत्यादी विशिष्ट विषयांवर आधारित उपसमित्यांची स्थापना करावी.
- इको क्लब अंतर्गत उपक्रमाचा आढावा व नियोजन करण्यासाठी महिन्यातून किमान एका बैठकीचे आयोजन करावे. प्रत्येक बैठकीचे इतिवृत्त तयार करून सर्व सदस्यांना देण्यात यावे.

Scanned with OKEN Scanner

परिशिष्ट 7

शिक्षा सप्ताह – शैक्षणिक उत्कृष्टतेचा उत्सव

दिवस सातवा

28 जुलै 2024

विद्यांजली हा भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत शालेय शिक्षण आणि साक्षरता विभागाद्वारे चालवला जाणारा एक महत्वाकांक्षी कार्यक्रम आहे. विद्यांजली पोर्टलचा आधार घेऊन माजी विद्यार्थ्यांच्या मदतीने, कार्यरत आणि सेवानिवृत्त शिक्षक, शास्त्रज्ञ, सरकारी/निमशासकीय अधिकारी, सेवानिवृत्त सशस्त्र दलाचे कर्मचारी, स्वयंरोजगार आणि पगारदार व्यावसायिक, गृहिणी, आणि इतर कोणत्याही संस्था/समूह किंवा कंपनी यातील व्यक्ती त्यांचे ज्ञान आणि कौशल्ये शाळेतील विद्यार्थ्यांना प्रदान करू शकता किंवा शाळेसाठी मालमत्ता/साहित्य/उपकरणे यांचे योगदान देऊ शकतात.

उद्दिष्टे –

1.शाळांचे सक्षमीकरण करणे.

2. लोकसमुदायाच्या माध्यमातून शालेय

3. शाळा व समाज यांच्यामध्ये उत्तम नातेसंबंध प्रस्थापित करणे.

4. समाजातील घटकांमध्ये शाळेविषयीचे उत्तरदायित्व निर्माण करणे.

विद्यांजली कार्यक्रमाचा व्याप्ती व वाढवण्यासाठी शिक्षा सप्ताहाच्या सहाव्या दिवशी पुढील उपक्रमांचे आयोजन केले जावे.

1. विद्यांजली पोर्टलवर शाळांची नोंदणी करणे.

2. शाळेला मदत करणाऱ्या सक्रिय स्वयंसेवकांची नावे शाळेच्या दर्शनी फलकावर लिहिणे.

3. समाजामध्ये विद्यांजली कार्यक्रमाविषयी जागरूकता निर्माण करणे. त्यासाठी प्रभात फेऱ्या ,पथनाट्य, पोस्टर मेकिंग, विद्यांजली कार्यक्रमासंदर्भात घोषवाक्ये स्पर्धा आदी उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

4. विद्यांजली पोर्टलवर स्थानिक समुदायाला स्वयंसेवक बनण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी शाळा व्यवस्थापन समितीच्या सहकार्याने शाळेमध्ये व समाजामध्ये स्वयंसेवक बनो अभियान राबविणे.

6. शालेय परिपाठामध्ये शिक्षक, विद्यार्थी व डायट मधील अधिकारी यांचे मार्फत विद्यांजली कार्यक्रमाविषयी मार्गदर्शन करणे

Scanned with OKEN Scanner

7. विद्यांजली कार्यक्रमाविषयी समाज माध्यमे, स्थानिक रेडिओ वाहिन्या, पी एम ई विद्या चॅनल्स यांच्या माध्यमातून जनजागृती करणे.
8. शालेय स्तरावर विद्यांजली कार्यक्रमाविषयी राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची समाज माध्यमे व प्रसार माध्यमे याद्वारे प्रसिद्धी करण्यात यावी.

अपेक्षित परिणाम –

1. विद्यांजली पोर्टलवर शाळांची नोंदणी वाढेल
2. शाळांचे सक्षमीकरण होईल.
3. शाळा व समाज यामध्ये उत्तम नाते संबंध निर्माण होईल.
4.समाजातील घटकांमध्ये शाळेविषयीचे उत्तरदायित्व निर्माण होईल.

सामाजिक शास्त्र विभाग
SCERTM

Scanned with OKEN Scanner